# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३०/७/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त**

**बुधवार,** दिनांक **३० जुलै २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी ४-०० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.)श्री.उध्दव घुगे, तसेच **नगर सचिव** म्हणुन उप आयुक्त(प्र.) **श्री.एम.वाय.कांबळे** व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. वसंत नरवडे पाटील
६. सौ. अल्पा विकास जैन
७. श्री. संजय जोशी
८. श्रीमती जयश्री किवळेकर
९. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
१०. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
११. श्री. कचरू सोनवणे
१२. श्री. सिताराम सुरे
१३. श्री. नारायण कुचे

**संवाद :**

मा. सभापती : विषय क्र.७५, ७६ ऐनवेळचा विषय क्र. ७७ व ७८ मंजूर.

**विषय क्र. ७५ :**

दिनांक **१०/०६/२००८** (का.प.क्र.६), दि.१७/०६/२००८ ची तहकुब व **१८/०६/२००८** (का.प.क्र.७) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक **१०/०६/२००८,** दि.१७/०६/२००८ ची तहकुब व **१८/०६/२००८** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, खिजरी (हत्ती) गेट या ऐतिहासिक दरवाज्याची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण २ निविदापत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मुबारक मेहबुब पठाण | ९.२५% कमी दराने |
| २. | गायत्री आर्कीटेक्ट | ७.२५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मुबारक मेहबुब पठाण यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले होते. त्यानुसार मा.स्थायी समिती सभा दि.१८.५.२००८ विषय क्र.२९ अन्वये सदर ठेवण्यात आलेला प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला आहे.

तरी मुबारक मेहबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराच्या निविदेचा स्विकार करणेचा प्रस्ताव पुन:श्च मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खिजरी (हत्ती) गेट या ऐतिहासिक दरवाज्याची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झ ाालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराची मुबारक महेबुब पठाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**- ऐनवेळचे विषय -**

**विषय क्र. ७७ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ. व उ.) या विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ मो.सरस्वती कॉलनी येथील नाला संरक्षित भिंत पुर्णपणे कोसळलेली असून ती तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. परिसरातील नागरीकांची नाला संरक्षित भिंत दुरूस्त करणे व उंची वाढविणेची मागणी आहे. त्यानुसार मो.सरस्वती कॉलनी येथील नाला संरक्षित भिंत दुरूस्त करणे व उंची वाढविणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याचे सन २००७-०८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,३९,८००/- होत आहे. सदरील काम स.स्वीकृत सदस्य ॲड.श्री.राजेश व्यास यांच्या स्वेच्छा निधीमधून करणेस त्यांनी पत्राद्वारे सहमती दिली आहे. प्रस्तावित काम मुं.प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ नियम २ (२) अंतर्गत मंजुरीस्तव प्रस्तावित आहे.

तरी रक्कम रू.१,३९,८००/- चे काम अंदाजपत्रकानुसार उपलब्ध कंत्राटदाराकडून करून घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सरस्वती कॉलनी येथील नाला संरक्षित भिंत दुरूस्त करणे व उंची वाढविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१,३९,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ नियम २ (२) अंतर्गत अंदाजपत्रकानुसार उपलब्ध कंत्राटदाराकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ जलतरण तलाव येथे रंगरंगोटी व इतर कामे करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१,४८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून दिनांक १ एप्रिल २००८ पासून सदरील ठिकाणी अखिल भारतीय पोलीस जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने सदरील काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसीची ड प्रकरण ५ संविदा चे नियम २(२) अन्वये इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने काम करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती समोन सादर करणेबाबत शिफारस केलेली होती. प्रकरणी मा.स्थायी समितीने विषय क्र.४६१ अ दिनांक १५.३.२००८ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ संविदाचे नियम २(२) अन्वये इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने करून घेण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरील काम त्यांच्याकडून करून घेण्यात आलेले आहे. सदरील कामाची पाहणी मा.पोलीस आयुक्त व मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी केलेली आहे. त्यांच्या आदेशान्वये काही अतिरिक्त कामे करून घेण्यात आली असुन त्यासाठी रक्कम रू.१,०१,८७५/- चे वाढीव अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.१,४८,००० + १,०१,८७५ = २,४९,८७५/- चा प्रस्ताव व मुळ गुत्तेदार मे. इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव येथे रंगरंगोटी व इतर कामे करणे या अंतर्गत काही अतिरिक्त कामे करून घेण्यात आली असल्याने सदरील कामाचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.१,४८,००० + १,०१,८७५ = २,४९,८७५/- च्या अंदाजपत्रकास तसेच मुळ गुत्तेदार मे. इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद/चर्चा :**

श्री.सिताराम सुरे : पाणी पुरवठा विभागातील एन-७ येथील श्री.निर्मल हे मनपाचे कर्मचारी आहेत या मनपाच्या कर्मचा-यानी नागरीकांकडून पैसे घेवू मालमत्ता कर व पाणी पट्टीकर निल करून देतो म्हणून पैसे उकाळलेले आहे. अशी लेखी तक्रार दिलेली आहे. सदर कर्मचा-यांवर कारवाई करून

नागरीकांना रितसर पैसे भरणा केल्याची पावती देण्यात यावी. असे किती कर्मचारी आहेत जे नागरीकांची खोटी फसवूणक करीत आहेत.

श्रीमती जयश्री किवळेकर: सदर कर्मचा-यांवर प्रशासनातर्फे त्वरीत कारवाई करण्यात यावी.

श्री.संजय जोशी : यापुर्वी वार्ड अ मधे असा प्रकार घडला होता. पार्कीग बाबतचा विषय होता त्या कर्मचाऱ्याला टर्मीनेट केले होते सदरील प्रकरणाबाबतची सत्यता पडताळून त्वरीत कामावरून कमी करण्यात यावे जेणे करून बनावट उदयोग करणायांना आळा बसेल.

श्री.सिताराम सुरे : नविन नळ कनेक्शन देत नाही याचे कारण काय आहे?

श्री.नारायण कुचे : निर्मल नावाच्या व्यक्तीने माझ्या वार्डात देखील असा प्रकार केलेला आहे. त्याची पोस्ट काय आहे? तो मनपाचा कर्मचारी आहे की खाजगी एजंट आहे?

मा.सभापती : लाईनमन निर्मल यांच्या विरूध्द तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. वसुली संदर्भात कर निर्धारक व संकलक श्री.अरब माहिती देतील.

करमुल्य नि.व सं अ. : दिनांक १ जुलै रोजी समितीने १ लाख १० लाख ५० लाख १ कोटीच्या थकबाकी असणा-या मालमत्ता धारकांची यादी तयार करण्यास सांगीतले होते सदरची यादी मा.सभापती यांचेकडे देण्यात आलेली आहे.

श्री.संजय जोशी : मालमत्ता,पाणीपट्टी आणि मनपाच्या मालमत्ता वसुली व इतर वसुली बाबत माहिती द्यवी.

करमुल्य नि.व सं अ. : यादी सर्व सदस्यांना पुरविण्यात येईल. सन २००८-२००९ साली औरंगाबाद मनपाच्या मालमत्ता वसुलीचे उदिष्ट प्रशासनातर्फे ३२ कोटीचे ठेवले होते, परंतु मा.स्थायी समितीने वाढवून ३९ कोटीचे उदिष्ट केले होते व सर्वसाधारण सभेने ते उदिष्ट ५६ काटीचे केले होते. प्रशासनाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा २४ कोटीची वाढ सर्वसाधारण सभेने केली होती.

श्री.अ.रशिद खान : वाढविलेले २४ कोटी आणणार कुठून?

मा.सभापती : मालमत्ता वसुलीचे उदिष्ट मागील माजी सभापती यांनी दिले होते.

श्री.अ.रशिद खान : एक लाख वरील किती थकबाकीदार आहेत.

करमुल्य नि.व सं अ. : एक लाख ते एक कोटी पर्यंत ३०७ मालमत्ता थकबाकीदार आहेत. ११ कोटी अठ्ठेचाळीस लाख अठ्ठयात्तर हजार ऐकशे सदोतिस रूपये थकबाकी आहे.

श्री.संजय जोशी : मालमत्ता कराचे किती वसुली झाली आहे. व कितीचे टार्गेट ठेवले आहे.

करमुल्य नि.व सं अ. : २७ जुलै पर्यंत सहा वार्डाचे पाच कोटी अठ्ठयाहत्तर लाख सत्तेचाळीस हजार चारशे अकरा रूपये वसूल झालेले आहे. वसूलीचे उदिष्ट ५६ कोटी ठेवण्यात आलेले आहे. प्रशासनाचे उदिष्ट ३२ कोटीचे आहे.

श्री.संजय जोशी : ५६ कोटीपैकी फक्त ५ कोटी वसूल झाले आहे. सदरील वसूली हि ५६ कोटीपैकी आहे की ३२ कोटीपैकी आहे.

करमुल्य नि.व सं अ. : सर्वसाधारण सभेने दिलेल्या उदिष्टापैकी ५ कोटी वसुल झाले आहे. मागील वर्षीपेक्षा हयावर्षी जास्तीची वसुली झाली आहे.

श्री.संजय जोशी : मागील वर्षीपेक्षा हया वर्षी शहरातील मालमत्ता वाढल्या आहेत. सव्वाकोटी रूपये स्पेकला देण्यात आले होते, मात्र वसूली हि काहिच नाही. कर्मचाऱ्यांच्या पगारावर महिण्याला ४.५० कोटी खर्च होता. आतापर्यंत महिण्याच्या पगारा एवढी सुध्दा वसूली नाही. शहर विकासाचे कामे कसे होणार आज महानगरपालिकेकडे चोक अप काढण्याकरीता बद्दी घेण्याकरीता देखील प्रशासनाकडे पैसे नाही. केवळ वसुलीकडे दुर्लक्ष केल्यामुळे हि स्थिती झाली आहे. वसुली संदर्भात काय नियोजन आहे.

करमुल्य नि.व सं अ. :मोठया थकबाकीदारांकडे वसुली करीता प्रत्यक्ष जावून तकादा लावण्यात येईल.

श्री.संजय जोशी :डिसेंबर पर्यंत रिवाईझ बजेट येईल परत स्पिल वर्क, हयाच प्रकारे वसुली झाली तर दिवा बत्तीची सुध्दा व्यवस्था करू शकणार नाही. शाखा अभियंता पासून ते कनिष्ठ अभियंता पर्यंत सर्वांना आपण वसूलीकरीता लावू. १२ टक्के विलंब शुल्क आकारणी केल्यामुळे आज वसूली होत आहे परंतु प्रशासनाने वसूलीकरीता कुठल्या उपाययोजना केल्या आहेत.

मा.सभापती : प्रशासनामार्फत वसूली करीता कुठले प्रयत्न चालू आहे.

श्री.संजय जोशी : जे नागरीक नियमीत कर भरणा करतात त्यांच्याकडेच तकादा लावण्यात येता परंतु वर्षानुवर्ष जे नागरीक,व्यापारी व इतर कर भरणा करत नाही त्यांच्याबाबतीत प्रशासन काहिच करत नाही. व १२ टक्के विलंब आकारणी नियमानुसार करता येत नाही. वसूलीकरीता कुणाला जबाबदार धरावयाचे.

| | |
|---|---|
| श्री.वसंत नरवडे | : मनपाची नेमकी वसुली किती होईल व ५६ कोटी वसूल होणार कसे याचा अभ्यास प्रशासनाने केला आहे काय? स्पेक ने दिलेल्या नोटीसाप्रमाणे २० कोटी नविन मालमत्ता द्वारा उत्पन्न होईल असे स्पेकने सांगीतले तर खरच प्रशासनाने हया नविन मालमत्ताचा अभ्यास केला आहे काय? ५६ कोटींचा जो आकडा देण्यात आलेला आहे तो प्रशासनाला मंजूर आहे काय? एवढी वसुली प्रशासन करू शकते का? हे स्पष्ट व्हायला पाहिजे होते. उपआयुक्त (म) यांचे वसूलीवर नियंत्रण असायला हवे, फेब्रुवारी आणि मार्च महिण्यात फक्त कर्मचारी वसुली करतात, स्पेक द्वारा ज्या नविन मालमत्ता दिल्या त्या नसतील तर त्यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावा. मालमत्ता संदर्भात १० ते १५ वर्षापासून न्यायालयात खटले प्रलंबित आहे त्यात प्रशासनाने एक कमिटी नेमून त्यांच्याशी तडजोड करून मालमत्ता वसूल करायला हवे. |
| मा.सभापती | : कोर्टात किती मालमत्ता धारकांच्या केसेस चालू आहे. |
| करमुल्य नि.व सं अ. | : मा.न्यायालयात १९८९ पासून प्रलंबीत मालमत्ताच्या वसुलीपोटी १२ ते १३ कोटी एवढी रक्कम येणे बाकी आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : प्रथमतः यादी तयार करा की, कोर्टात किती केसेस दाखल केलेल्या आहे. बऱ्याचशा ठिकाणी स्पेकने कर वाढवून दिलेले आहे त्याची एक यादी तयार करा. सर्व कामे एक महिणा बंद करून सर्वांना वसुली करीता लावले जावे, वसुलीकरीता एक पंधरवाडा घेवून त्यात नागरीकांना त्यांच्या प्रलंबित देयकावर विशेष सुट देवून वसूली करण्यात यावी. वसूलीचे काम झाले नाही तर लोकप्रतिनिधी म्हणून शहराचा विकास आपण करू शकत नाही. थकबाकी कुठल्या बेसवर थकली आहे याची माहिती दयावी. व्यावसायीक, शैक्षणिक संस्था, बिल्डर, हॉस्पीटल, वकील, असा वेगवेगळा विभाग करून त्यांच्याशी निगडीत अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे वसूली करण्यात यावी. महापालिकेद्वारे ऑगस्ट हा वसूली महिना करून वसूली करण्यात यावी. याची सर्व जबाबदारी महसूल विभागाने करावे. फक्त बैठकीत चर्चा होऊन रेझुलेशन होते व त्यानंतर काहीही होत नाही. |
| मा.सभापती | : वार्ड अ ते ई यांच्याकडून मालमत्ता वसूली संदर्भात डिमांड फिक्स झाली आहे काय? |
| करमुल्य नि.व सं अ. | : दोन वार्ड सोडून बाकीच्या टार्गेट डिमांड फिक्स आलेली आहे. |
| श्री.संजय जोशी | : मार्च महिना हा आर्थिक वर्ष असून आज ऑगस्ट महिना आला तरी टार्गेट डिमांड फिक्स झालेली नाही. **क** अणि **ड** विभागाची वसुली किती होणार याची माहितीच प्रशासनाला प्राप्त नाही तर वसुली काय होणार? |
| मा.सभापती | : वर्ष संपत आले तरी वार्ड निहाय डिमांडच आलेली नाही. कुणाकडून किती वसूल करावयाचे याची माहितीच प्रशासनाकडे नाही. |
| श्री.संजय जोशी | : सगळया अधिकाऱ्यांच्या पगारापुरती वसुली होत आहे. जकात सुरू असल्यामुळे शहरातील थोडेफार कामे सुरू आहे. उपकर लागू झाला तर एक इंचभर रस्ता आपण करू शकणार नाही. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : अधिकारी/कर्मचारी यांची वसूलीसाठी पगाराशी सांगड घालावी. |
| श्री.संजय जोशी | : प्रशासनाकडे परिपुर्ण माहितीच आलेली नाही. कारण माहिती नसेल तर वेळ कशासाठी वाया घालवयाचा, शॉपिंग सेंटर बाबत माहितीही आलेली नाही. मालमत्तेची फक्त आकडेवारी आलेली आहे. मॉलच्या वसूलीबाबत काहीही झालेले नाही. सगळे मिळून यात सामिल झालेले आहेत. जे नियमीत टॅक्स अदा करतात त्यांच्यावरच हा बोजा पडत आहे. |
| मा.सभापती | : आठ दिवसांचा वेळ देवून डिमांड फिक्स करून घेवू. |
| श्री.अ.रशिद खान | : ३१ ऑगस्ट नंतर किती टक्के दराने पैसे भरावयाचे. |
| मा.सभापती | : ३१ ऑगस्ट नंतर १२ टक्के व्याज दराने कर भरावयाचा आहे. सर्वसाधारण सभेने तसा निर्णय घेतला आहे. |
| करमुल्य नि.व सं अ. | : विलंब शुल्क म्हणुन आपण १२ टक्के व्याज याप्रमाणे कर आकारण्यात येणार आहे. नाशिक वगैरे महानगरपालिकेत अशी सिस्टीम आहे. |
| मा.सभापती | : एमएसइबी व बीएसएनएल विभाग सुध्दा विलंब शुल्क आकारण्यात येतो. |
| श्री.संजय जोशी | : कुठल्या नियमानुसार १२ टक्के व्याज आकरण्यात येतो. |
| मा.सभापती | :सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येतो. |
| श्री.संजय जोशी | : आपण घेतलेल्या कुठल्याच रूलिंगवर परिणाम होत नाही, |
| मा.सभापती | : सर्वधारण सभेमधे सदरील मुद्दा मांडण्यात यावा. **क** व **ड** वार्ड सोडून इतर वार्डाची डिमांड आलेली आहे काय? |

करमुल्य नि.व सं अ. : विलंब शुल्क आकारणी मागील वर्षासाठी आहे चालू वर्षासाठी विलंब शुल्क आकारणी लावण्यात आलेली नाही.

श्री.सिताराम सुरे : सहकारी संस्थेला मालमत्ता करात सुट दिली जाते काय? कृषी उत्पन्न बाजार समितीकडे साधारणः साडेचार ते पाच कोटी रूपये थकबाकी आहे.

मा.सभापती : सदरची माहिती प्रशासनाकडे आहे काय?

करमुल्य नि.व सं अ. : माहिती उपलब्ध नाही.

श्री.संजय जोशी : साडे चार ते पाच कोटी थकबाकीदारांची माहितीच प्रशासनाकडे उपलब्ध नाही.

श्री.कचरू मोरे : थकबाकीच माहिती नाही तर ५६ कोटी कसे वसूल करणार?

मा.सभापती : जोपर्यंत सदरचे मॅटर हे पगाराशी सांगड घालावे म्हणजे वसूली होईल. वसुली ज्या प्रमाणात त्या प्रमाणात पगार असे धोरण अवलंबावे लागेल. २४ तारखेला यादी सादर करण्यात आली परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती ची थकबाकीच दाखविण्यात आलेली नाही.

श्री.सिताराम सुरे : ५६ कोटीचे वसूलीत कृषी उत्पन्न बाजार समिती चे पाच कोटी रूपये ॲड झालेले आहेत काय?

करमुल्य नि.व सं अ. : जेवढी थकबाकी आहे त्यांची सर्वाची यादी तयार केलेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती बद्दल माहिती नाही.

मा.सभापती : आठ दिवस होवून सुध्दा माहिती मिळत नसेल तर महिण्यातुन १ वर्षातुन एकदाच बैठक बोलावू म्हणजे अधिकारांचा अभ्यास पुर्ण होईल? स.सदस्य तळतळीणे सांगतात त्याला अधिकारी काही महत्वच देत नाही.

श्री.सिताराम सुरे : या विषयी काय भुमिका घेणार गेल्या तिन वर्षापासून वसूली करणार म्हणून आम्ही ऐकत आहे वसूली केव्हा केली जाणार?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : १२ टक्के संदर्भात सर्वसाधारसभेला आपण विनंती करू की सदरील मुदतवाढ वाढवून देण्यात यावी, वॉर्ड अधिकारी,कर्मचारी यांना उदिष्ट देवून वसूली करण्यात यावी. ज्या वार्डानी डिमांड फिक्स केली नाही त्यांना विचारण्यात यावे की का करण्यात आली नाही. वसूली आतापर्यंत का झाली नाही याची विचारणा संबधीत अधिकाऱ्यांना विचारण्यात यावी.

मा.सभापती : लेखापरिक्षक यांना आठ दिवस देवून त्यांच्याकडून सर्व वार्डाची डिमांड फिक्स करून घेवू. सर्व अधिका-यांच्या वसूलीशी निगडीत पगार देवू. तो पर्यंत वसूली होणार नाही.

श्री.संजय जोशी : वसूली जेवढया प्रमाणात होईल तेवढयाच प्रमाणात पगार देण्यात यावे.

सौ. मोमीन सफिया : सिल्क मिल कॉलनी येथील स्पेकने एक नोटीस दिली आहे स्वरूपाची दिसते. त्यावर मिळकत धारकांचे नाव देण्यात आलेले नाही, फक्त सिल्क मिल कॉलनी असा पत्ता देण्यात आलेला आहे.

मा.सभापती : मिळकत धारकाचे नाव सदरील नोटीस मधे देण्यात आलेले नाही.

श्री.वसंत नरवडे : मुख्य वसुली किती होणार आहे याचा अभ्यास करून वसूली निश्चिती करण्यात यावी. स्पेकने काढलेला नविण मालमत्ता शोधण्यात याव्या. एस.आय पासून ते उपआयुक्त या सर्वाना वसूली कामासाठी लावण्यात यावे. प्रत्येक कर्मचाऱ्याला दहा घर देण्यात यावी व त्यांच्याकडून वसूली करण्यात यावी. आठ दिवसात सर्व वार्ड अधिकाऱ्यांनी त्यांच्या वार्डातील वसुली संदर्भात डिमांड फिक्स करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : विस रूपयांच्या स्टॅम्पवर घर नावावर होते, विस रूपयांच्या स्टॅम्पद्वारे नोटरी करून देण्यात येते, टॅक्स तसाच बाकी असतो, घर एकाच्या नावावर असते तर नळ कनेक्शन दुर-याच्या नावावर असते नळ कनेक्शन ज्यांच्या नावावर असते तो पाच ते दहा वर्षांचा टॅक्स तसाच असतो व घर ज्यांच्या नावावर असते त्यांनाच टॅक्स येतो, अशा बोगस स्वरूपाच्या नोटीस आहेत त्या संपविण्यात याव्या. ज्याच्या नावावर घर आहे त्यांच्याच नावावर नळ कनेक्शन असायला हवे.

श्री.वसंत नरवडे : टॅक्स विभागाने जो पर्यंत मागील टॅक्स पुर्णपणे अदा केला जात नाही तोपर्यंत नवे नामांतर करण्यात येवू नये. मनपाच्या कर्मचा-यांकडून पुर्ण सर्व्हे करायला हवा. त्यात त्यांची स्वतःच्या घराची पावती, मालमत्ता पावती, नळ कनेक्शन पावती, नामांतर झालेले कागदपत्र अशा सर्व कागदपत्रांची छाननी करून सर्व्हे करायला हवा.

श्री.कचरू मोरे : आपण प्रशानाला डिमांड देवू परंतू नागरीकांची पैसे भरण्याची मानसिकता का होत नाही याचा विचार करायला हवा. कारण निवासेत्तर कर लावण्यात येतो. स्पेकनेही व्यवसायीक कर,

निवासेत्तर कर असे कर लावण्यात आलेले आहे. निवासी कर लावण्यात आलेले नाही. नागरीकांची मानसिकता बदलण्यासाठी काही तरी उपाय योजना कराव्या लागतील. कर्मचाऱ्यांना कामाचा मापदंड ठरवून दिलेला नाही, प्रशासनाचे कुठलेही नियंत्रण नाही हया सर्व कारणामुळे वसुलीवर परिणाम होत आहे. पोलिस खात्याला हेल्मेट संदर्भात टार्गेट देण्यात आलेले आहे तेवढे टार्गेट झाले नाही तर त्यांच्यावर लगेच कारवाई करण्यात येते. वसुली संदर्भातील जे विभाग आहे त्यांचे दररोजचे आकडे आलेच पाहिजे असा दंडक घातला गेला पाहिजे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत कुढले आहे ते आम्हाला कळाले पाहिजे. जणे करून प्रशासनाला व जनतेला आम्हाला मदत करता येईल. आंध्रा प्रदेश मधील महानगरपालिका फक्त मालमत्ता कर व पाणीपट्टी करावरच चालत आहे. तिथे ऑक्ट्राय नाही.

श्री.वसंत नरवडे : निवासी कर शोधून मनपाने एक एक ग्रुप निर्माण करून जनतेला कर भरणा करण्याकरीता प्रवृत्त करून वसूली करण्यात यावी.

मा.सभापती : टॅक्स वसूली संदर्भात स.सदस्यांनी अनेक महत्वाचे मुद्दे मांडण्यात आलेले आहे. यात एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, दोन वार्डातील व इतर वार्डातील डिमांडच फिक्स झालेली नाही. यात सर्वप्रथम मुख्य लेखापरिक्षक यांनी वार्ड **अ** ते **फ** मधे जावून सर्व वार्डांची डिमांड फिक्स करण्यात यावी. श्री.अरब हे त्यांच्यासोबत राहतील. वॉर्ड अधिकारी, वॉर्ड इंजिनिअर तसेच सर्व संबधीत कर्मचारी त्यांना मदत करतील. मुख्य लेखापरिक्षक यांनी आठ दिवसात डिमांड निश्चित करून वसूली करण्यात यावी व जे कर्मचारी अधिकारी वसूली करीत नाही त्यांच्यावर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल. उपआयुक्त महसूल हे वसूली करीता काय काय करता येईल हे सांगतील त्यावर स्थायी समिती गंभीरपणे नोंद घेवून पुढील कार्यवाही करतील.

श्री.अ.रशिद खान : गुत्तेदारांकडे जेवढे पैसे असतील तेवढेच त्यांनी कामे घ्यावी. गुत्तेदारांची कामे हि व्यवस्थितरित्या चालले आहे.

मा.सभापती : मनपाची आर्थीक स्थिती जोपर्यंत सुधरत नाही तोपर्यंत आपण एका गुत्तेदारास तिनच कामे देण्यात यावी. असे धोरण राबवावे लागेल.

श्री.अ.रशिद खान : वर्क ऑर्डर घेवून किती गुत्तेदारांनी कामे केली नाही याची यादी मागविण्यात यावी. अशा गुत्तेदारांना वॉर्निंग देवून त्यांना काळया यादीत समाविष्ट करण्यात यावे. प्रशासनाने कामे न केलेल्या गुत्तेदारांना नोटीस देवून कामे का करत नाही याची विचारणा करायला पाहिजे.

(यावेळी सभागृहात स.सदस्य आपसांत मोठमोठयाने बोलत असल्यामुळे स्पष्ट ऐकू येत नाही)

श्री.वसंत नरवडे : कालच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे मित्र प्रश्न करत होते की, टॅक्स वर आपण व्याज लावत आहे तर आमचे जे बिल बाकी आहे त्यावर आपण व्याज देणार आहे काय? छोटे गुत्तेदारांचे आवाक्याच्या बाहेर कामे झालेले आहे.

श्री.अ.रशिद खान : जेवढे पैसे असतील तेवढीच कामे घेण्यात यावी. एका गुत्तेदाराने विस विस कामे घेतली आहे त्यामुळे हि स्थिती निर्माण झाली आहे.

श्री.वसंत नरवडे : इ-टेंडरींग मुळे कुठला गुत्तेदार किती टेंडर भरतो हे कळत नाही. ओपन असते तर आपण त्यावर निर्बंध घातले असते. सरकारकडून मनपास फंड नियमीत येत असतो, तर हया वर्षी मनपाची आर्थिक स्थिती का खालावली आहे? कुठे पैसे चालले आहे, किती कामे गुत्तेदारांनी घेतली आहे,किती बिल देणे बाकी आहे,किती कामे प्रलंबीत आहे. याची यादी मागविण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : किती गुत्तेदारांना किती कामे दिलेली आहे? किती बिले देणे प्रलंबित आहे बिले देण्यात का आली नाही. याची माहिती तात्काळ देण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : मागील वर्क ऑर्डरचे काम बाकी असतांना पुन्हा नविण कामे गुत्तेदारांनी घेतलेली आहे. त्यामुळे आमचे कामे थांबलेले आहे. मला फक्त माझे काम झालेले हवे गुत्तेदाराचा बिल का नाही भेटले याचा माझ्या वार्डाशी काहीही संबध नाही सदरचा प्रश्न प्रशासन आणि गुत्तेदार यांच्यातला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : तसेच कुणाच्या वार्डात किती कामे झाली याची माहिती देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : गुंठेवारी बाबत प्रश्न आहे. गुंठेवारी बाबत सन २००५ मधे मा.महापौर किशनचंद तनवाणी यांच्या सभागृहाने गुंठेवारी जिथे करता येत नाही, तेथील आरक्षण उठविले होते असे सर्वसाधारण सभेने सुचविलेले आहे. वॉर्ड ब कार्यालयात नागरीकांनी गुंठेवारीचे पैसे

भरण्यासाठी गेले असता त्यांना अडवणूक केली जाते, कि तुमच्या जागेवर प्लॉटवर आरक्षण आहे. तेथे तुम्हाला चलन देता येत नाही.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा सादर करावा. तसेच बील किती बाकी आहे याची माहिती श्री.संजय पवार यांनी द्यावी.

श्री.सिताराम सुरे : वार्ड वाईज माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : स.सदस्य यांनी मागणी केल्यानुसार तिन्ही एक्जीक्युटिव्ह इंजिनिअर, वॉर्ड निहाय व मुख्य लेखाधिकारी यांच्याकडे किती बिले आलेली आहेत किती पेंडिग आहे किती बिल अदा केलेली आहे याची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी तसेच वर्क ऑर्डर घेवून किती कामे प्रलंबीत आहे याची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : आरक्षण सोडून माझ्या वार्डात साधारणत: ३१ मे २००८ पर्यंत ४७,८४,१४२/- रूपये जमा झालेले आहे. अनेक वेळा तक्रारी करून कामे करून घेण्यात आलेली आहे वर्क ऑर्डर होवून सुध्दा कामे होत नाही.

मा.सभापती : वर्क ऑर्डर होवून सुध्दा कामे झालेली नाही याबाबत लेखी माहिती प्रशासनाने पुढील बैठकीत देण्यात यावी. गुंठेवारी बाबत श्री.पी.जी.पवार यांनी खुलासा सादर करावा.

उप अभि.(न.र.) : २००५ मधे सर्वसाधारण सभेमधे जे आरक्षण रद्द करण्यात आलेले आहे, त्या आरक्षणामधे बिल्डींग परमिशन देण्यात यावी. असे मंजूर केलेले आहे.

श्री.सिताराम सुरे : नगर रचनाचे अधिकारी श्री.पवार यांनी खुलासा केलेला आहे नागरीकांनी मनपाच्या तिजोरीत भर घालावी कि नाही का त्यांनी बेकायदेशिररित्या बांधकाम करावे, जे अधिकारी नागरीकांना गुंठेवारीबाबत वेढीस धरत आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेने जे आरक्षण रद्द करण्यात आलेले होते त्यांच्यावर पुन्हा बिल्डींग परवानगी देण्यात येते का? सरकारकडुन मान्यता आली आहे काय? खुलासा करावा.

उप अभि.(न.र.) : गुंठेवारी कायदयात तरतुद आहे की तशी मान्यता देण्यात येते.

मा.सभापती :नियमात असतांना गुंठेवारीची कारवाई का करण्यात आली नाही याबाबतची माहिती उप आयुक्त(म.) पुढील बैठकीत सादर करतील त्यानुसार संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती मोमीन सफिया : गुंठेवारी बाबत वारंवार मागणी करून सुध्दा माहिती दिली जात नाही, त्यामुळे वॉर्ड इंजिनीअर व वॉर्ड ऑफिसर यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : पुढील बैठकीमधे उप आयुक्त(म.) माहिती सादर करतील त्यावर आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करू.

श्री.वसंत नरवडे : स्थायी समितीमधे जे रूलिंग दिले जाते त्यावर प्रशासनातर्फे कुठलीही ॲक्शन घेतली जात नाही. नगर सचिव जे काही नोंदी घेतात तेवढे इतिवृत्तात येते. न्युऑन बाबत मागील बैठकीमधे आपण रूलिंग दिली होती परंतु उपआयुक्त(म),(प्र) यांनी याबाबत कुठलीही ॲक्शन घेण्यात आलेली नाही.

मा.सभापती : स्थायी समितीत दिलेल्या रूलिंगवर प्रशासनातर्फे कुठलीही कारवाई होत नाही यात काडीमात्र शंका नाही. आपण सर्व सदस्य आयुक्तांना भेटून सदरची बाब निर्देशनास आणून देवू.

श्री.वसंत नरवडे : टॅक्सच्या बाबतीत तिच समस्या आहे, ८०० स्के.फुटचा फ्लॅट आहे खालच्या दोन मजल्याला १८०० रूपये टॅक्स लावण्यात आलेला आहे तर तिसऱ्या मजल्यावर २९०० रूपये टॅक्स लावण्यात आलेला आहे, तीन दिवसांपासून डॉक्टर मसलेकर हे चकरा मारू लागले आहे त्यांना डिमांड का देण्यात येत नाही. तिसऱ्या मजल्यावर काही वेगळया स्वरूपाच्या सुविधा देण्यात येते का? श्री.वाहूळ यांच्या काळात एकदा हेअरिंग होवून टॅक्स कमी करण्यात आला होता.

मा.सभापती : उप आयुक्त(म.) श्री.घुगे हे डॉ.मसलेकर प्रकरणात जातीने लक्ष घालून दोन दिवसात त्याचे प्रकरण निकाली काढतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स्थायी समितीत जेव्हापासून आम्ही आलोत तेव्हापासून जे जे निर्णय झाले आहेत त्यात प्रशासनाने कुठले ॲक्शन घेतले आहे,तसेच ॲक्शन घेतली नसेलतर ॲक्शन का घेण्यात आली नाही. याबाबत पुढील बैठकीमधे माहिती देण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : अजबनगर माझ्या वार्डातील नागरीक श्री.चावडा यांनी सन २००४ मधे बांधकाम परवानगीसाठी फाईल सादर केलेली आहे. टि.पी. सेक्शन ने विधी सल्लागार यांचा अभिप्राय

मागीतला होता, विधी सल्लागार यांनी पत्र पाठवून सांगीतले की सदरील प्रकरण न्यायाप्रविष्ठ आहे. विधी सल्लागार यांनी खुलासा सादर करावा.

मा.सभापती : विधी सल्लागार यांचा अभिप्राय आलेला आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, बांधकाम परवानगी देता येत नाही कारण की सदरील जागा महानगरपालिकेच्या ताब्यातील आहे.

श्री.सतिष कटकटे : श्री.चावडा यांच्या कडे पि.आर कार्ड आहे त्यांनी बेबाकी प्रमाणपत्र दाखल केले आहे, त्यांनी बांधकाम परवानगी दाखल केली आहे.

विधी सल्लागार : अजबनगर मधील जागा मनपाची असल्याने बांधकाम परवानगी देता येत नाही असा अभिप्राय देण्यात आलेला आहे. संबंधीतांच्या पि.आर कार्ड वर जी नोंद झाली त्याबाबत मालमत्ता विभागात कारवाई सुरू आहे. मालमत्ता विभागाकडे याबाबत माहिती मिळेल.

मा.सभापती : पुढील बैठकीमधे उप आयुक्त(म.)श्री.घुगे कोर्ट केस नंबरसह माहिती सादर करतील.

श्री.अ.रशिद खान : गांधी पुतळा ते भडकल गेट येथील अतिक्रमण केव्हा काढले जाणार आहे.

उपआयुक्त (सिडको) : सोमवारी सराफाबाजार रोडचे अतिक्रमण काढले जाणार आहे त्याकरीता जाहिर प्रगटन देण्यात येईल, ज्या रोडचे पुर्ण मार्किंग होवून टाउन प्लॅनिंगद्वारे नोटीसा देण्यात आलेल्या असतील त्याच रोडचे काम हाती घेण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : पैठणगेट येथे मार्कींग करून एक महिणा झाला आहे, तरी अतिक्रमण काढण्यात आलेले नाही.

मा.सभापती : जे ११ रोड निश्‍चित झालेले आहे तेथीलच अतिक्रमण काढले जाणार आहे, नविन कुठलाही रोड घेण्यात आलेला नाही. पैठणगेट येथील काही प्रमाणात अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डात ३६ मिटर रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे जे नविन रस्ते समाविष्ट झालेले आहे त्यात माझ्या वार्डातील रस्त्याचा समावेश करण्यात यावा.

उपआयुक्त (सिडको) : पैठणगेट येथील काही नागरीकांनी स्वत:हून काढलेली आहे. ती जवळपास साठ टक्के असून पैठणगेट येथील चाळीस टक्के राहिलेला भाग काढण्यासाठी नागरीकांची उद्या सकाळी एक बैठक बोलावण्यात आली आहे. त्यात स.सदस्य यांना बोलावण्यात येईल व त्याबाबतीत निर्णय घेण्यात येईल.

मा.सभापती : ज्या ज्या भागाचे रूंदिकरणात जागा ताब्यात घेव्यायाच्या आहे त्या भागातील स.सदस्यांना,नागरीकांना विश्वासात घेवून मोहिम राबविण्यात यावी.

श्री.वसंत नरवडे : पैठणगेट येथील ११ ते १२ प्रॉपर्टी आहे तर तेथील नागरीकांना विश्वासात घेवून नागरीकांमधे संभ्रम निर्माण होणार नाही त्यादृष्टीने परिपुर्ण माहिती/कागदपत्रांसह उपस्थित राहून अंतिम बैठकीच्या दृष्टीने सदरची बैठक घेण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : पैठणगेट येथे श्री.एम.एम.खान चार वेळेस कशासाठी तेथे येतात.

मा.सभापती : स.सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला की, श्री.एम.एम.खान चार वेळेस कशासाठी तेथे गेले होते याबाबत श्री.शेट्टे चौकशी करून पुढील बैठकीत अहवाल देतील.

श्री.सिताराम सुरे : आयआरडीपीचे ज्या रस्त्यांचे काम चालू आहे. त्या रस्त्यांचे कामाचे अंदाजपत्रकामधे त्यांना सेनेटरी वॉटर कशे दयावयाचे, ड्रेनेज लाईन शिफ्टींग कशी करावयाची, वॉटर लाईन कशी शिफ्टींग करावयाची या संदर्भात काही नियोजन असते का? याबाबत काहि माहिती मिळेल काय? कारण की माझ्या वार्डात आयआरडीपीचे रस्त्यांचे काम चालू आहे त्यांनी ड्रेनेज लाईन पुर्णपणे तोडण्यात आली आहे त्यामुळे नागरीकांच्या घरात ड्रेनेजचे पाणी घुसलेले आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीमधे सदरचा विषय घेण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे : दिनांक ३१ जुलै २००८ रोजी खाजगी गुत्तेदारांना साफसफाईचे कंत्राट संपत आहे. १ ऑगस्ट रोजी काय पर्यायी व्यवस्था केली आहे. तसेच नोव्हॉन औषध केव्हा मिळणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

आरोग्य वै.अधिकारी : **ब** आणि **ड** वार्ड साफसफाईचे टेंडर संबधी उदया पेपरमधे जाहिर प्रगटन येईल सदरच्या प्रोसेसला साधारणः दोन ते तिन आठवडे लागणार आहे. तोपर्यंत हयाच गुत्तेदारांनी काम करावे असे अपेक्षीत आहे.

श्री.वसंत नरवडे : सदर गुत्तेदाराला मुदतवाढ देतांना कोणाची मंजूरी घेण्यात आली आहे काय?

आरोग्य वै.अधिकारी : नाही.

मा.सभापती : स्थायी समितीने टेंडर रद्द केले, गुत्तेदाराला ब्लॅक लिस्ट केले तरी सुध्दा साफसफाईची मुदतवाढ देण्यात येत आहे व त्यांच्याकडून साफसफाईचे काम आजपर्यंत करून घेत आहे कुठल्या नियमानुसार काम करून घेत आहे. सदर गुत्तेदाराला मुदतवाढ देण्याची गरज नाही. १ ऑगस्ट पासून महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून साफसफाई करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : आरोग्य वै.अधिकारी अनधिकृतपणे काम करत आहे त्याची जबाबदारी कुणाची.

आरोग्य वै.अधिकारी : महानगरपालिकेकडे मजूरांची संख्या पुरेशी उपलब्ध नाही.

श्री.अ.रशिद खान : पूर्वी महानगरपालिकेकडे तेवढेच वार्ड होते व मनपाच्या मजूरांकडूनच साफसफाईचे काम होत होते. जे मजूर महानगरपालिकेच्या विवीध विभागात शिपाई म्हणून कार्यरत आहे. त्यांना साफसफाईसाठी लावण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : १ ऑगस्ट पासून महानगरपालिकेच्या मजूरांकडून साफसफाईचे काम करून घेण्यात यावे.

श्री.कचरू मोरे : प्रकल्प विभागाशी संबधीत प्रश्न आहे. दारीद्र रेषेचा जो सर्वे झाला त्यात अनेक बाबींमधे अनियमीतता आहे. ही गोष्ट वास्तववादी आहे की जो सर्वे झाला त्यात आरसीसी इमारती आहेत त्यांचे नावे आहेत, सरकारी नौकर, माजी नगरसेवक यांचे दारीद्ररेषेच्या सर्वेमधे नावे आलेली आहे. दारीद्र रेषेखालील असणाऱ्यांच्या घरात दुखद घटना झाल्यास शासन त्यांना दिड लाखाची मदत करते, ही बाब अतिशय गंभिर स्वरूपाची आहे म्हणून पुन्हा सर्वेक्षण करून ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सर्वे करतांना अनियमितता झाली आहे त्यांचे विरूध्द कार्यवाही झाली पाहिजे.

प्रकल्प संचालक : गेल्या दोन वर्षापासून आम्ही आक्षेप मागवित आहोत आक्षेप आले असते तर नावे वगळली गेली असती. एक महिण्यापूर्वी महानगरपालिकेच्या वतीने पुन्हा एक परिपत्रक काढण्यात येवून स.नगरसेवकांना विनंती करण्यात आली आहे व वृत्तपत्रात जाहीरात देवून अपिल केले आहे की, ज्या लोकांना यादी बाबत काही आक्षेप असतील व जे अपात्र लोक असतील तर अशा लोकांबाबत आक्षेप नोंदवून अर्ज करून नावे वगळू शकतात. असे आवाहन केले आहे. ३१ तारखेपर्यत अर्ज स्विकारावे असे शासनाने म्हटले आहे. या नंतर सदर यादीवर काय कारवाई करावयाची याबाबत शासन नंतर कळवतील. असा आदेश आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीमध्ये सविस्तर आणि पुर्ण माहिती देण्यात यावी.

"राष्ट्रगिता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद